“महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास” योजनेअंतर्गत महानगरपालिकेस निधी वितरीत करण्याबाबत.

सन २०१७-२०१८ साठी लेखाशिर्ष (२२१७ ०९१३) खाली रक्कम रू. ३६७ कोटी.

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०१७/प्र.क्र.१७०-अ/नवि-१६

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- २८ मार्च, २०१८.

वाचा :-

(१) शासन निर्णय क्रमांक-धोरण-२०१७/प्र.क्र.९६/नवि-१६, दिनांक १२ डिसेंबर,२०१७.

(२) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३,दिनांक १८ एप्रिल,२०१७.

(३) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३,दिनांक ६ फेब्रुवारी,२०१८.

प्रस्तावना :-

राज्यातील महानगरपालिकांना मुलभूत सोई सुविधांचा विकास करण्याच्या कामांसाठी अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे निकष संदर्भाधीन क्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. संदर्भाधीन क्र. (२) व (३) येथील वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार “महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास” या योजनेअंतर्गत राज्यातील महानगरपालिकांना विविध विकास कामांकरीता “अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर” निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ नुसार राज्यातील महानगरपालिकांना विविध विकास कामांकरीता “महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास” या योजनेअंतर्गत **रक्कम रु.३६७,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीनशे सदुसष्ट**

कोटी मात्र) इतका निधी वितरीत करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा व कामे स्वतंत्ररीत्या निश्चित करण्यात येतील.

३. सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात येणा-या कामांना प्रकल्प खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-यांची (कार्यान्वयन यंत्रणेच्या) तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.

४. शासनस्तरावरून निश्चित करण्यात येणा-या कामांकरीता संबधित कार्यान्वयन यंत्रणेने सविस्तर प्रस्ताव बनवून त्यास तांत्रिक मान्यता प्रदान करावी व सदरचा प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीस सादर करावा.जिल्हास्तरीय समितीने प्रस्तावित कामाची जागा ताब्यात असल्याची खातरजमा करावी. प्रस्तावित काम विकास आराखडा व विकास नियमावली तसेच, प्रचलित नियमांशी सुसंगत असल्याची खातरजमा करावी. प्रस्तावाची सविस्तर छाननी करून प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव शासनास सादर करावा.सदर योजनेअंतर्गत प्रशासकीय मंजूरीचे अधिकार शासनास राहतील.

५. तांत्रिक मान्यता दिलेली कमी किमतीची (रू. १० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे कामे) एकत्रित करून शासनाकडून एकत्रित प्रशासकीय मान्यता (Package) प्रदान करण्यात आलेली आहे. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीची ई-निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम हे ई-निविदा पद्धतीनेच करणे बंधनकारक असून, **प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीचे पुनश्च विलगीकरण (Splitting) करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.**

६. सदर शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व: उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरूक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

७. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या “ई-निविदा” अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

८. “ई-निविदा” अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

९. जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना “ई-निविदा” कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. “ई-निविदा” कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत

वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर योजनेअंतर्गत करण्यात येणा-या रस्त्यांच्या कामांना इतर कोणत्याही योजनेमधून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही अथवा सदरची कामे करण्यात आलेली नाही याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(ग) पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे.प्रस्तावित रस्त्यांच्या ठीकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.संदर्भाधीन क्र. (५) च्या शासन निर्णयामधील अटी व शर्थींचे पालन करण्यात यावे.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

<u>१०. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-</u>

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

११. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन,संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

१२. दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर ही निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०१७-२०१८ करीता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

१३. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधीचे कार्यान्वयन यंत्रणेस वितरण करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी, यांना नियंत्रक अधिकारी तसेच, संबंधित जिल्हा प्रशासन अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. प्रपत्र-अ नुसार मंजूर निधी संबंधित जिल्हाधिकारी, यांचेकडे नियंत्रक अधिकारी म्हणून वर्ग करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदरचा निधी आहरीत करून संबधित कार्यान्वयन यंत्रणेस तात्काळ वितरीत करावा.

१४. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये “महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास” या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती (महानगरपालिका ५०% हिस्सा व जिल्हास्तरीय समितीची प्रश्सकीय मान्यता ही अट वगळून) बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तींची पुर्तता झाल्याची व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात यावी.

१५. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना या लेखाशिर्षाखाली सन २०१५-२०१६ करीता वितरीत केलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

१६. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिका-याने करावी.असे गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करू नये.

१७. या लेखाशिर्षाखाली एक वर्षावरील जुने संक्षिप्त देयक प्रलंबितअसल्यास निधी आहरीत करू नये.असे प्रस्ताव वित्त विभागाची सहमती घेण्यासाठी नगर विकास विभागाकडे पाठविण्यात यावेत.

१८. आहरण व संवितरण अधिका-याने सदरचे आहरीत करण्यात येणारे अनुदान तात्काळ संबधितास वितरीत करावे. सदरचे अनुदान दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०१९ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

१९. राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी तात्काळ संबधित नागरी कार्यान्वयन यंत्रणा यांना **कोणत्याही प्रकारची कपात न करता** वितरीत करण्यात यावा. सदरचा निधी जिल्हाधिकारी यांनी थेट वळता करू नये.

२०. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास,वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ अन्वये कार्यवाही करावी.

२१. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.-अर्थसं-२०१५/प्र.क्र.८९/अर्थ-३ दिनांक २० एप्रिल,२०१६ मधील सोबतच्या परिशिष्टाच्या अ.क्र. (९) मधील तपासणी सूचीतील अ.क्र. (५),(६),(७) व (८) तसेच, शासन परिपत्रकामधील परिच्छेद (७) ते (१८) पैकी परिच्छेद क्र. (७),(८),(१२),(१३),(१५), (१६) व (१८) लागू होत नाहीत. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक -संकिर्ण-२०१६/प्र.क्र.-३१/कोषा.प्रशा-५ दिनांक १० मे,२०१६ च्या परिच्छेद (अ) मधील क्र. (६),(८),(९) व (१०) लागू होत नाहीत. उर्वरीत बाबींची उपरोक्त परिच्छेदांनुसार पुर्तता करण्यात आली आहे.उर्वरीत बाबींची उपरोक्त परिच्छेदांनुसार पुर्तता करण्यात आली आहे.

२२. यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, नगर विकास,८०,सर्वसाधारण,१९१, महानगरपालिकांना सहाय्य, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (००)(०९) महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद (२२१७ ०९१३), ३१, सहाय्यक अनुदान, या लेखाशिर्षाखाली सन २०१७-२०१८ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

२३. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.-अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३ दिनांक १८ एप्रिल,२०१७ नुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार सदरचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

२४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१८१२५८९०२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Shankar Kumbhar

Digitally signed by Vivek Shankar Kumbhar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ef935067970760fbaec2fa421af2eac23d3b8737b990883be0d8ef292ba28a2f, serialNumber=5e3716fd0fe61ee87305882bc35ee7e757293849e74351e2ab33e4eb40bfb646, cn=Vivek Shankar Kumbhar
Date: 2018.03.28 19:00:21 +05'30'

(विवेक कुंभार)

अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई-१८
३. सर्व विभागीय आयुक्त
४. सर्व जिल्हाधिकारी
५. सर्व आयुक्त, महानगरपालिका
६. मा.राज्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
८. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१३. सर्व जिल्हा प्रशासन अधिकारी
१४. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.
१५. कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०१७/प्र.क्र.१७०-अ/नवि-१६दिनांक २८ मार्च,२०१८

सोबतचे प्रपत्र-अ

अ. क्र.	**महानगरपालिका**	**मंजूर रक्कम रू. (कोटी)**
१	नागपूर महानगरपालिका	६०.००
२	चंद्रपूर महानगरपालिका	५.००
३	लातूर महानगरपालिका	१०.००
४	पुणे महानगरपालिका	४०.००
५	पिंपरी-चिंचवड महानगरपालिका	१५.००
६	सांगली महानगरपालिका	५.००
७	सोलापूर महानगरपालिका	१०.००
८	कोल्हापूर महानगरपालिका	१०.००
९	नाशिक महानगरपालिका	३०.००
१०	जळगांव महानगरपालिका	५.००
११	ठाणे महानगरपालिका	१५.००
१२	मिरा-भाईन्दर महानगरपालिका	५.००
१३	नवी-मुंबई महानगरपालिका	५.००
१४	बृहन्मुंबई महानगरपालिका	१५२.००
एकूण रक्कम रू. (कोटी)		**३६७.००**